
# १९ व्या शतकातील अस्पृश्यांच्या साहित्याचे स्वरूप आणि प्रेरणा

प्रा. डॉ. शशिकांत खिलारे
श्रीमती चंपाबेन बालचंद शाह, महिला महाविद्यालय, सांगली.

## प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या समाजजीवनात एकोणिसाव्या शतकाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण या शतकात महाराष्ट्रात समाजप्रबोधनाची चळवळ सुरू झाली. या चळवळीमुळे शतकानुशतके अज्ञान, दास्य, विषमता, गुलामगिरीत खितपत पडलेल्या अस्पृश्य समाजाला प्रथमच जोतीराव फुले यांच्या प्रेरणेने प्रकाशाचा किरण दिसला. आणि आम्हीही माणसं आहोत याचा साक्षात्कार झाला. या पहिल्या प्रयत्नामध्ये निबंधकार मुक्ताबाई साळवे, धर्मचिकित्सक गोपाळबाबा वळंगकर या सारख्या अस्पृश्यांना आपल्या आत्मस्थितीची जाणीव झाली. त्यांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर साहित्याची रचना केली. ते सर्व साहित्य लौकिक होते. तर याच कालखंडात मराठी साहित्य परंपरेत शाहिरी वाङ्मयाला विशेष बहर आलेला होता. अस्पृश्य समाजातील उमा बाबू सावळजकर, बाबाजी शिदू साठे, पेडकर, संभू गोपाळा नाझरेकर, सत्तू सुब्राव मोहिते कवलापूरकर यासारख्या शाहिरांनी आपल्या कवनांच्या माध्यमातून लोकरंजन केले आहे. हे लोकरंजन करताना त्यांनी ज्या रचना आणि वगांची निर्मिती केली आहे. त्यांना तोड नाही. एकोणिसाव्या शतकामध्ये अस्पृश्य असणाऱ्या मुक्ताबाई साळवे यांनी आपल्या समाजावरील अन्याय, अत्याचाराला 'मांगा म्हारांच्या दु:खाविषयी' मधून वाचा फोडलेली आहे. तर गोपाळबाबा वळंगकरांनी 'विनंती पत्रा' मधून धर्मग्रंथांची चिकित्सा करून हिंदू धर्म ग्रंथाच्या आधारे हिंदू धर्म मार्तंडाना त्यांनी काही प्रश्न विचारलेले आहेत. त्यामुळे मुक्ताबाई साळवे आणि गोपाळबाबा वळंगकरांची परंपरा ही लौकिक साहित्याची आहे. तर उमा बाबू सावळजकर आणि इतर शाहिरांची परंपरा ही मिश्र स्वरूपाची होती. उमा बाबूंचा 'मोहना बटाव' हा वग श्रृंगारिक आहे तो लौकिक आहे पण त्यांच्या इतर रचना ह्या आध्यात्मिक आणि कूट प्रश्नांची मांडणी करून रसिकांचे मनोरंजन करणाऱ्या होत्या. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातील अस्पृश्यांच्या साहित्यांचे स्वरूप आणि त्यांच्या प्रेरणांचा अभ्यास प्रस्तुत निबंधात करावयाचा आहे.

रूढ अर्थाने पूर्वास्पृश्यांच्या साहित्याला 'दलित साहित्य' असे म्हटले जात असले तरी 'दलित साहित्य' हा शब्दही आता एकविसाव्या शतकात मागे पडत चाललेला आहे. त्याऐवजी 'फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य' अशी काही वेगळी नावे त्याला प्राप्त होत आहेत. 'दलित' या शब्दाचा पहिला उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. हा उल्लेख प्रथम १९ नोव्हेबर १९२८ च्या 'बहिष्कृत भारत' च्या अंकात प्रासंगिक विचार या सदरात 'दलित'[१] हा शब्द प्रथम वापरला होता. त्यापूर्वी दलित हा शब्द अस्तित्वात नव्हता. साहित्याच्या प्रांतात मात्र आप्पासाहेब रणपिसे यांनी दलित हा शब्दप्रयोग १२ नोव्हेंबर १९५३ च्या 'जनता' पत्रातील ''दलित साहित्याचे समालोचन''[२] या लेखात केला आहे. दलित साहित्य या शब्दाबद्दल ज्येष्ठ विचारवंत राजा ढाले 'धम्मलिपी' या नियतकालिकातील 'दलित साहित्याची पूर्वधारा' मध्ये म्हणतात की, ''दलित साहित्य हा शब्दप्रयोग अगदी अलिकडे अस्तित्वात आला असला तरी दलित साहित्याची धारा मात्र अगली अलिकडे अस्तित्वात आली असे अनुमान त्यावरून काढता येणार नाही. उलट तिच्यामागे शे-दीडशे वर्षाचे संचित असून तहत इंग्रजी अमदानीपासून ही धारा आपल्या परीने सतत वाहत आलेली आहे ……. परंतु ही जगावेगळी धारा आजपर्यंत दुर्लक्षित आणि उपेक्षित राहिलेली आहे.''[३] या विचारामधून दलित साहित्याची धारा अव्वल इंग्रजी कालखंडापासून म्हणजेच एकोणिसाव्या शतकापासून सुरू आहे असे सिध्द होते. एकोणिसाव्या शतकात निर्माण झालेल्या अस्पृश्यांच्या साहित्याला 'दलित साहित्य' म्हणता येणार नाही कारण ते कालसुसंगत होणार नाही. म्हणून या साहित्यास 'अस्पृश्यांचे साहित्य' असा शब्दप्रयोग केलेला आहे.



एकोणिसाव्या शतकाने महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आले. या काळात जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन लोकांना प्राप्त झाला. समाजप्रबोधनाची सुरूवात झाली. या शतकापूर्वी महाराष्ट्रातील समाजजीवन परंपरावादी होते. समाजव्यवस्थेत वर्णजातींची विषमताप्रधान चौकट, ज्ञान व श्रम यांची फारकत, दैववाद अंध:श्रध्दा, स्वयंपूर्ण व बंदिस्त ग्रामजीवन, स्त्रीदास्य अशा तत्कालीन समाजजीवनाची काही वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामुळे ही समाजव्यवस्था विषमतामूलक बनली होती. समाजातील बहुसंख्य वर्ग अज्ञानात चाचपडत होता. वर्णव्यवस्थेने आणि जातिव्यवस्थेने अस्पृश्य वर्गालाहीन अवस्था प्राप्त झाली होती. अस्पृश्य वर्गावर सामाजिक,

आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात गुलामगिरी लादलेली होती. अस्पृश्य वर्गाचे शोषण अनेक मार्गाने होत होते. १९ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील समाजजीवन थंड गोळ्याप्रमाणे होते. त्यात कसल्याही प्रकारचा बदल संभवत नव्हता. महाराष्ट्राच्या समाज जीवनातील वरील वैशिष्ट्यांमध्ये एकोणिसाव्या शतकात बदल झाला. हा बदल प्रामुख्याने ''नवी शासनपध्दती, इंग्रजी शिक्षण आणि ख्रिस्ती धर्मप्रसार''[४] यांच्या माध्यमातून घडला. त्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची नवी विचारसरणी तयार झाली. त्याचप्रमाणे भारतीय समाजरचना विषमतामुलक आहे याची जाणीव भारतीय प्रबोधनाने झाली. या प्रबोधनाने समाजातील शोषित, पिडीत समाजाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी पाश्चात्य प्रबोधनामुळे निर्माण झाली. या नव्या दृष्टीमुळे अस्पृश्य लोकांना आपल्या गुलामगिरीची जाणीव झाली एवढेच नव्हे तर प्रस्थापित धर्मशास्त्रातील विसंगतीचे त्यांना दर्शन घडले. आपल्या अवनतीस येथील धर्मव्यवस्था आणि समाजव्यवस्थाच कारणीभूत आहे. याचा त्यांना साक्षात्कार झाला. या अस्पृश्य समाजातील काही लोक साक्षर झाले त्यांनी आपल्या समाजावर होणारा अन्याय, अत्याचार साहित्यातून मोडण्यास प्रारंभ केला तर काहींनी परंपरागत शाहिरीच्या माध्यमातून लोकरंजन करण्याचा प्रयत्न केला.

मुक्ताबाई साळवे या अकरा वर्षांच्या मुलीचा 'मांगा म्हाराच्या दु:खाविषयी' या नावाचा निबंध १ मार्च १८५५ सालच्या 'ज्ञानोदय' या नियतकालिकात प्रसिध्द झाला होता. मुक्ताबाई साळवे ही जोतीराव फुले यांच्या शाळेत शिकणारी मुलगी होती. या अकरा वर्णीय मुलीने आपल्या निबंधातून अस्पृश्यांची कैफियत मांडलेली आहे. ही कैफियत मांडताना मुक्ताबाईने अस्पृश्यांना भोगाव्या लागणाऱ्या अन्याय, अत्याचार, विषमता यांचे दर्शन या निबंधातून घडविले आहे. या निबंधामध्ये मुक्ताबाई सवर्ण हिंदू समाजाला काही प्रश्न विचारते. ती म्हणते की, आम्हा अस्पृश्यांना वेदांचा अभ्यास करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे आम्हास धर्मग्रंथ नाही. म्हणून आम्ही धर्मरहित आहोत. इतर धर्मीयांना त्यांचे त्यांचे धर्मग्रंथ आहेत. परंतु आम्हास मात्र ते नाहीत. ही धार्मिक विषमता आमच्या वाट्याला येत आहे. यासंबंधी मुक्ताबाई म्हणते की, ''ज्या धर्माचा एकानेच अनुभव घ्याव व बाकीच्यांनी खादाड मनुष्याच्या तोंडाकडेस पहावे. तो व त्यासारखे धर्म पृथ्वीवरून नष्ट होवोत.''[५] अशा धर्माचा अभिमान आम्ही का बाळगावा असा प्रश्न विचारताना त्यांनी हिंदू धर्माला नकार दिलेला आहे. आपल्या समाजाच्या लोकांवर होणा-या अन्याय, अत्याचाराचे दर्शन घडविताना ती म्हणते की, आम्हा मांग महाराच्या लोकांना मोठ मोठ्या इमारतीच्या पायात जीवंतपणे गाडले जाते आणि त्यांचा निर्वंश केला जातो. आम्हास पशूपेक्षाही हीन वागणूक दिली जाते. याविरूध्द कोणाकडे तक्रार ही करता येत नाही यासंबंधी मुक्ताबाई म्हणते की, ''..... तुम्ही लंगड्या गाढवास मारा बरे. त्याचा धनी तुमची फटफजिती करून तरी राहील की काय ? परंतु मांग महारास मारू नका असे म्हणणारा कोण बरे ? त्यासमयी मांग अथवा महार ह्यातून कोणी तालिमखान्यापुढून गेला असता. गुलटेकडीच्या मैदानात त्याच्या शिराचा चेंडू आणि तरवारीचा दांडू करून खेळत होते.''[६] या विचारामधून अस्पृश्य असणाऱ्या समाजावर कोणीही जुलुम जबरदस्ती करावी. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करावा त्याबाबत कोणाकडे तक्रार करण्याची सोय नव्हती. समाजात शिवाशिव मोठ्या प्रमाणात होती. अशावेळी जातिश्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळे महार लोक सुध्दा मांगांना शिवत नव्हते. हे वास्तव मुक्ताबाई मांडताना दिसते. त्याचबरोबर अस्पृश्यत्वामुळे सवर्ण लोक अस्पृश्य समाजातील लोकांना नोकरीस ठेवत नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे पैसा येत नाही म्हणून ते दरिद्री झाले आहेत. मांगा-म्हाराच्या लोकांना कोणत्याच प्रकारच्या सुविधा दिल्या जात नाहीत त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत असते. एवढेच नव्हे तर ब्राह्मणांची मुले, माणसे, अस्पृश्यांच्यावर शारीरिक अन्याय, अत्याचार करतात याची कोणाकडे दाद मागते येत नाही याचे दु:ख मुक्ताबाईला वाटते.

इंग्रजांचा अंमल भारत देशात सुरू झाल्यानंतर मात्र सामाजिक जीवनात परिवर्तन आल्याचे मुक्ताबाईला वाटते. पूर्वी पेशवाईच्या काळात आणि त्यापूर्वीच्या काळात अस्पृश्यांच्यावर जो जुलूम बाजीरावांच्या लोकांकडून होत होता तो आता कमी झाला आहे. विविध प्रकारच्या स्वातंत्र्याचा अनुभव त्यांना येऊ लागला ही सुखावणारी गोष्ट अस्पृश्यांच्या वाट्याला येऊ लागली. याचा आनंद आणि आश्चर्य मुक्ताबाईला वाटते तिच्या मते इंग्रजांचे राज्य हे दयाळू लोकांचे आहे.

'मांगा-म्हाराच्या दु:खाविषयी' या निबंधात मुक्ताबाईने अस्पृश्य असणाऱ्या समाजाला कोणत्याच प्रकारचे समानतेने हक्क दिले जात नाहीत याची तिला खंत आहे. त्याचप्रमाणे अस्पृश्य हे सुध्दा मानव आहेत. त्यांना माणुसकीचे हक्क दिले पाहिजेत ही मानवतेची मागणी मुक्ताबाई करताना दिसते. याबरोबरच अस्पृश्यांच्यावर अन्याय, अत्याचार केले जातात हे वास्तव ती समाजासमोर मांडते. तसेच विषमतेने सारा समाज ग्रासलेला आहे. सर्वांना सर्व प्रकारचे हक्क मिळाले पाहिजेत यासाठी ती आग्रही आहे. याबरोबरच अस्पृश्यांना शिक्षणाचा हक्क मिळाला पाहिजेत. त्याशिवाय त्यांच्या जीवनमानात फरक पडणार नाही याची जाणीव मुक्ताबाईला आहे. 'मांगा-म्हारांच्या दु:खाविषयी' या निबंधात मुक्ताबाईने ज्या प्रश्नांची चर्चा केली आहे ते सर्व प्रश्न जोतीराव फुले यांनी समाजासमोर मांडलेले आहेत. त्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाजप्रबोधन केले आहे. मुक्ताबाईने प्रारंभ काळात पहिल्यांदाच अस्पृश्यांचे प्रश्न जगासमोर मांडण्याचे धाडस दाखविले आहे. याच्यामागे जोतीराव फुले यांच्या प्रेरणा आहेत.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या चिकित्सक लेखनाच्या जोरावर गोपाळबाबा वळंगकर यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. गोपाळबाबा वळंगकर हे ब्रिटीश सैन्यात होते. १८८६ साली ते सैन्यातून सेवानिवृत्त झाले आणि कोकणातील दापोलीजवळच्या रावंढळ गावी ते स्थायिक झाले. या काळात अस्पृश्य असणाऱ्या समाजाच्या दु:स्थितीचे, हालाखीचे, दारिद्र्याचे, विषमतेचे दर्शन त्यांना जवळून झाले. या काळातच त्यांचा जोतीराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजाशी संबंध आला होता. याबरोबरच इंग्रजी शिक्षण आणि पुरोगामी विचारांच्या इंग्रज

अधिकाऱ्यांचा सहवास आणि भौतिक विषयावरचे वाचन यामुळे त्यांचा समाजसुधारकांचा पिंड तयार झाला. यामधूनच त्यांनी 'विनंती पत्र' या नावाची एक पुस्तिका लिहिली आहे. या पुस्तिकेमधून त्यांनी हिंदू धर्मांची परखडपणे चिकित्सा केलेली आहे.

हिंदू धर्मातील अस्पृश्य असणाऱ्या समाजाला सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात समानता अनुभवता येत नव्हती त्यांना समानतेचे हक्क प्राप्त होत नव्हते याची त्यांना खंत होती. कोकणातील एका महार समाजाच्या माणसाने सवर्णाप्रमाणे दुमजली माडीचे घर बांधले त्याची वास्तु शांती ब्राह्मणाकरवी केली या घटनेने त्या महार कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकला कारण अस्पृश्य कितीही श्रीमंत झाला तरी त्याने मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे सवर्णांची बरोबरी करायची नसते जर अस्पृश्य समाजातील लोकांनी सवर्णांची बरोबरी केली तर त्याला मनुस्मृतीत शिक्षेची तरतूद केलेली आहे. यानुसार त्या अस्पृश्य कुटुंबाला सामाजिक बहिष्काराची शिक्षा दिली गेली. ही गोष्ट गोपाळबाबा वळंगकरांना रूचणारी नव्हती वळंगकरांनी हिंदू धर्मातील वेद, शास्त्रे, पुराणे, इत्यादींचा बारकाईने अभ्यास केला होता. या अभ्यासातून त्यांनी जे प्रश्न हिंदू धर्ममार्तंडाना विचारले ते प्रश्न 'विनंती पत्र' या पुस्तिकेत आले आहेत.

हिंदू धर्म मार्तंडाना प्रश्न विचारताना गोपाळबाबांनी म्हटले आहे की अस्पृश्य असणाऱ्या महारांच्या घराची वास्तुशांती केल्यामुळे कोणता देव भ्रष्ट झाला ? या प्रश्नाबरोबर त्यांनी कोकणातील अस्पृश्यांच्या दुस्थितीची कैफियत समाजासमोर मांडली या कैफियतेमध्ये "त्यांनी हिंदू धर्मातील ऋगवेद, अथर्ववेद, नैतिरिय संहिता कठ उपनिषद, मनुस्मृती, महाभारत, भागवत, विष्णुपुराण, वायुपुराण, स्कंदपुराण, तंत्रशास्त्र, गुह्य संबंध यासारखे संस्कृतमधील सर्व ग्रंथांची वचने त्यांनी साधार मांडेलेली आहेत."[७] यामधून त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या त्यांच्या बुध्दिकौशल्याची आणि व्यासंगाची साक्ष पटते.

पवित्र हिंदूच्या गोमातेचा वध न करता ती मेल्यावर तिचे मांस भक्षण केल्याने महार अपवित्र आहेत तर ते खाण्याचे सोडल्याने किंवा परदेशस्थ लोकांप्रमाणे तिचा वध करून खाल्याने ते पवित्र होतील काय ? किंवा वेदकर्ते, ग्रंथकर्ते, पुराणकर्ते व अठरावर्ण उत्पन्नकर्ते ऋषी यांची उत्पत्ती बहुतकरून पशू, पुष्पे वगैरे नीच स्थितीपासून झाली आहे. असे हिंदूच्या ग्रंथात लिहिले आहे. उदाहरणार्थ अचलमुनी हत्तीपासून, अगस्त्यमुनी अगस्त्याच्या फुलापासून, व्यास कोळणीपासून उत्पन्न झाले आहेत. तसा महारांचा जनिता कोणी पशू, पक्षी, जलचर किंवा स्थावर पदार्थ आहे की, काय ? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती त्यांनी हिंदू धर्म मार्तंडाना विचारलेली आहेत. परंतु असे अनेक प्रश्न हिंदू सनातन्यांनी त्यांनी विचारले असले तरी त्याची उत्तरे त्यांच्याकडे नव्हती.

गोपाळबाबा वळंगकरांना इंग्रजी सैन्यात राहिल्यामुळे त्यांचा संबंध इंग्रजी साहित्य, कला यांच्याशी आला होता त्याचबरोबर जोतीराव फुल्यांशी त्यांचा संबंध आला असल्याने त्यांचा समाजसुधारकाचा पिंड तयार झाला. आणि गोपाळबाबांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात 'विनंती पत्र' लिहून अस्पृश्य समाजाची कैफियत समाजासमोर मांडलेली आहे.

गोपाळबाब वळंगकरांनी इ. स. १८९४ मध्ये सेवानिवृत्त अस्पृश्य सैनिकांचे एक 'निवेदन' इंग्रज सरकारला सादर केले होते. या निवेदनाच्या शेवटी पंडित कोंडीराम यांच्या नावाने एक कविता जोडलेली आहे. पंडित कोंडीरामाची फक्त एकच कविता 'निवेदन' बरोबर जोडलेली आहे. त्यांच्या इतरही काही कविता आहेत किंवा नाहीत याबद्दल काही सांगता येत नाही. पंडित कोंडीरामांची कविता अस्पृश्यांच्या दुःखाचे दर्शन घडविणारी तर आहेच परंतु ती आजच्या दलित साहित्यातील विद्रोहाचा स्वरही व्यक्त करणारी आहे. तसेच ती कविता आत्मपरीक्षण करायला लावणारीही आहे. पंडित कोंडीरामांच्या कवितेच्या सुरूवातीलाच त्यांनी अस्पृश्य समाजाच्या हीन अवस्थेचे दर्शन घडवून यास मनुस्मृती कारणीभूत आहे असे निःसंदिग्ध स्पष्ट केले आहे. आपल्या अस्पृश्य बांधवांच्या हीन अवस्थेचे वर्णन करताना ते म्हणतात की,

**"नागवी उघडी मुले कित्येक तर मातीत**
**कित्येक तर आली उकिरड्यात**
**तेल फणी नसे माहित त्या स्वप्नात**
**मोकळे ते केस सदा माती नखात**
**अंगी राख डोळे पिचकी चिंध्या ढुंगणी**
**पोट खपाटी सदा ते क्षुधाकांत**
**मेलेल्या गुरांची जेथे वाटे होतात**
**जमून तेथे सर्व बसती मिटक्या मारीत**
**हीन कळा तोंडावर त्यांच्या सदोदीत**

**विद्ये नावे बोंब मग ज्ञानी कोठुनी"**[८]

उपरोक्त कवितेमधून अस्पृश्यांच्या मुलांचे वास्तव दर्शन घडवित असताना ही मुले विद्येपासून खूप दूर आहेत त्यामुळे त्यांच्या वाट्याला हीन अवस्था प्राप्त झालली आहे. त्याकाळी अस्पृश्य समाजात तमाशा कलावंत निर्माण झाले होते. ते आपल्या मुलांना शिक्षण देण्याऐवजी तमाशात नाच्याचे काम करायला लावत असे याचा राग पंडित कोंडीरामांना आहे. आपल्या अस्पृश्य समाजात फैलावलेल्या अपप्रवृत्तींना त्यांनी विरोध **करताना म्हटले आहे की,**

**"पोटे जळेनात तर सोद्यांनो काटेही भरा**

**पूर्वापार दुःखाची मनी आठवण करा**

**मानवी प्राणी दिसता अभिमान जरा धरा**

**जाळी भटीशास्त्रे सत्य उपदेश करा**

**दिली सूचना ही तुम्हा पंडित कोंडीरामांनी"** [९]

अस्पृश्यांनी आपल्या हीन अवस्थेची मानात आठवण ठेवावी आणि विषमतावादी धर्मग्रंथ जाळण्याचे ते आवाहन करतात. पंडित कोंडीरामांनी या कवितेच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या हीन अवस्थेचे वर्णन करतानाच विषमतावादी धर्मग्रंथाबद्दल विद्रोह पुकारण्याचे आवाहन करताना दिसतात.

१९ व्या शतकात निबंधकार मुक्ताबाई, धर्मचिकित्सक गोपाळबाबा वळंगकर आणि पंडित कोंडीराम यांनी आपल्या अस्पृश्य समाजाच्या हीन अवस्थेचे वर्णन आपल्या साहित्यात केले आहे. त्याचबरोबर त्यांनी अस्पृश्य समाजाच्या व्यथा, वेदना आणि विद्रोहाचे चित्रण आपापल्या साहित्याच्या व्दारे केले आहे. परंतु १९ व्या शतकात उमा बाबू सावळजकर, बाबाजी शिदू साठे पेडकर, संभू गोपाळा नाझरेकर आणि सत्तू सुब्राव मोहिते कवलापूरकर या लेखक, कवींनी आपल्या अस्पृश्य समाजाचे दुःख मांडण्याऐवजी संपूर्ण समाजाचे लोकरंजन करण्याच्या हेतूने वगनाट्ये आणि लावणी वाङ्मयाची निर्मिती केलेली आहे.

उमा बाबू सावळजकरांनी शृंगारिक, ऐतिहासिक, पौराणिक अशा प्रकारच्या वगनाट्यांची निर्मिती केलेली आहे. या वगनाट्यामधून रसिकांचे मनोरंजन व्हावे अशी माफक अपेक्षा त्यांची होती असे दिसते. उमा बाबू सावळजकरांनी 'मोहना बटाव' या नावाच्या शृंगारिक, लालित्यपूर्ण असा पहिला पद्यात्मक वग इ. स. १८६०-७० च्या सुमारास लिहिला आहे असे उपलब्ध पुराव्यावरून वाटते. 'मोहना बटाव' हे मराठीतील पहिले लोकनाटक आहे असे तमाशाचे अभ्यासक नामदेव व्हटकर म्हणतात. उमा बाबू सावळजकरांनी 'राजा हरिश्चंद्र', 'चंद्रावळ गवळण' अशा स्वरूपाच्या रचना केलेल्या आहेत. परंतु या सर्व रचनात अत्यंत लोकप्रिय असणारा 'मोहना बटाव' हा वग आहे. 'मोहना बटाव' हा वग पद्यात्मक असून त्यास आख्यानक लावणी असेही म्हटले जाते. मोहनाराणी आणि बटाव यांची प्रेमकथा या आख्यानक लावणीत गुंफलेली आहे. ही आख्यानक लावणी म्हणजे एक वगनाट्याच आहे. या वगनाट्यात उमा बाबू सावळजकरांनी शृंगार, वीर, रसांचा परिपोष केलेला आहे. या वगात मोहना नारीच्या सौंदर्याचे वर्णन करताना उमा बाबू म्हणतात की,

**"मोहना नारीचं स्वरूप अनिवार**

**तनु सुकुमार**

**आलाया भार**

**खाशी दिसण्यात उमेतवार**

**फिरविती हात छातीवर**

**भिवया दोन्ही, चंद्राची कोर**

**तुटती तार**

**बावरी हरीण डोळं टवकार**

**चमकली वीज अस्मानावर"**[१०]

सौंदर्यवती असणाऱ्या मोहना नारीच्या स्वरूपाचे वर्णन उमा बाबूंनी अप्रतिम केलेले आहे. मोहना नारीच्या सौंदर्याने दिल्लीचे व्यापारी थक्क झाले आहेत. त्यांना वाटते की ही मुलगी जर आपला राजा बटावाला मिळाली तर किती बरे होईल. बटावाला मोहना राणीच्या सौंदर्याचे वर्णन करून सांगितल्यावर तो तिच्या सौंदर्यावर फिदा होऊन अहमदनगरला येतो. यावेळी उमा बाबूने निसर्गाचे लालित्यपूर्ण वर्णन करून प्रत्यक्ष

जंगलच रसिकांच्यापुढे उभे केले आहे. बटाव आपल्या प्रिय मोहना राणीला भेटण्यास आल्यावर त्याच्या स्वागताचे आणि जेवणातील पदार्थाचे उमा बाबूंनी अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे. मोहना राणी आणि बटावाच्या भेटीच्यावेळी राजा रामचंद्राचे आगमन होते हा नाट्यात्मक प्रसंग उभा केला आहे. अशाही प्रसंगी मोहना राणीचे आपल्या प्रिय बटावाला भेटण्याची शक्कल काढून ती भेटण्यास जाते. परंतु रामचंद्र राजे आणि बटावाची लढाई होऊन बटाव मारला जातो ही शोकांतिका घडते. परंतु मोहनाराणी पोटात खंजीर खुपसून मृत्यूला जवळ करते. अशी शोकात्म कथा या वगनाट्यात पाहण्यास मिळते. च्या वगनाट्यात खेड्यातील मराठी गड्यांसमोर त्यांच्या रोजच्या जीवनातील समजुती घटना, दाखले देऊन हे कल्पनारम्य शृंगारचित्र कवीने चितारलेले आहे. यात मराठीची रांगडी शब्द संपत्ती आहे. निसर्गाचे उत्कट वर्णन आहे. सुख आहे, दुःख आहे."[११] या वगनाट्याने त्याकाळी लोकांच्या लोकरंजनाची भूक भागविली आहे त्यामुळे ते आजही लोकप्रिय आहे.

उमा बाबू सावळजकरांनी मोहना बटाव या वगनाट्याबरोबर पौराणिक विषयावरील राजा हरिश्चंद्र, चंद्रावळ, गवळण अशा प्रकारची पद्यात्मक रचना केलेली आहे. त्याचबरोबर पेड येथील बाबाजी शिदू यांनीही अशाच प्रकारची पौराणिक रचना केलेल्या आहेत.

१९ व्या शतकात अस्पृश्य असणाऱ्या मुक्ताबाई साळवे, गोपाळबाबा वळंगकर, पंडित कोंडीराम यांनी लौकिक विषयावरील साहित्य रचना करून आपल्या समाजाची दुःखे साहित्याच्या माध्यमातून मांडलेली आहेत. या सर्वांनी जोतीराव फुल्यांच्या पासून प्रेरणा घेऊन समाजप्रबोधनाच्या हेतूने त्यांनी साहित्याची रचना केलेली आहे. तर याच कालखंडात उमा बाबू सावळजकर, बाबाजी शिदू साठे, सत्तू सुब्राव मोहिते इत्यादींनी लोकरंजनासाठी शृंगारिक, आध्यात्मिक, धार्मिक स्वरूपाच्या रचना केलेल्या आहेत. उमा बाबू आणि त्यांच्याबरोबर असणारे इतर कवींनी संस्कृत मधील आर्ष महाकाव्याच्या आदर्श डोळ्यासमोर ठेवून साहित्य निर्मिती केलेली आहे. मराठीमधील पंडिती आणि आख्यान काव्याचा प्रभाव त्यांच्या रचनेवर स्पष्टपणे दिसून येतो. एकंदरीतच १९ व्या शतकात समाजप्रबोधन आणि लोकरंजनाच्या हेतूने अस्पृश्य समाजातील लोकांनी साहित्याची रचना केलेली आहे असे दिसते.

## संदर्भ टिपा


१. बाबासाहेब आंबेडकर : बहिष्कृत भारत, प्रासंगिक विचार दि. १९/११/१९२६ पृ. २.

२. डी. बी. रत्नाकर : संकल्पना, संकल्पना प्रकाशन कोल्हापूर पृ. ३.

३. राजा ढाले : धम्मलिपी, १४ एप्रिल १९८८ पृ. १६.

४. राजा दीक्षित : इतिहास, समाजविचार आणि केशवसुत, समाजप्रबोधन पत्रिका एप्रिल / मे १९९१ वर्ष २८ पृ. ७२.

५. हरि नरके / य. दि. फडके : महात्मा फुले गौरव ग्रंथ खंड पहिला, महाराष्ट्र शासन शिक्षण विभाग मुंबई प्र. आ. १९८२, पृ. ७४७.

६. तत्रैव पृ. ७४७.

७. राजा ढाले : उनि. पृ. १६.

८. राजा ढाले : धम्मलिपी बुध्द जयंती विशेषांक, १ मे १९८८ पृ. ८.

९. राजा ढाले : तत्रैव.

१०. नामदेव व्हटकर : मराठीचे लोकनाट्य तमाशा कला आणि साहित्य, यशश्री प्रकाशन, कोल्हापूर प्र. आ. पृ. १२७.

११.नामदेव व्हटकर : तत्रैव.